NIGHT COLLEGE OF ARTS AND COMMERCE KOLHAPUR

Date. 6|9|2024

Academic Year - 2024-25

Activity Organized Report

| | |
|---|---|
| Title of the activity | स्त्री सन्मान परिषद |
| Date of activity organised | 6\|9\|2024 |
| Name of the department / committee | Marathi & Andhashradha Nirmulan Samiti |
| Name of the coordinator | Dr Arun Shinde |
| No. of participant ( Students + staff) | 5+1 =06 |
| Names of the expert or resource persons | Reshma Khade |
| Objective of the activity | To create awareness of gender equity and gender equality |
| Outcome of the activty | students will develop an awareness of gender equity and gender equality. |

प्रा.डॉ. अरुण शिंदे
मराठी विभाग प्रमुख
नाइट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

PRINCIPAL,
NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE
KOLHAPUR

Principal

Scanned with OKEN Scanner

10

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE KOLHAPUR.

# MoU
# With
# Maharashtra
# Andhashradha
# Nirmulan
# Samitti

Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE ★ KOLHAPUR.

# सामंजस्य करार

# (MEMORANDUM OF UNDERSTANDING)

## नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

## आणि

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूर जिल्हा शाखा

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूरची स्थापना थोर स्वातंत्र्यसेनानी पद्मश्री देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी १९७१ साली केली. दिवसा काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना रात्रीच्या वेळी शिकण्यासाठी व स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी नाइट कॉलेज स्थापन केले गेले. कला व वाणिज्य शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण येथे दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या नाइट कॉलेजने आपला स्वतंत्र ठसा निर्माण केला आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी ९ ऑगस्ट १९८९ रोजी केली. अंधश्रद्धामुक्त, विवेकी समाजनिर्मितीसाठी बांधील असलेल्या कृतिशील कार्यकर्त्यांच्या या संघटनेने पुढील पंचसूत्री स्वीकारलेली आहे – १. शोषण करणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे २. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार प्रसार आणि अंगीकार करणे ३. धर्माची विधायक, कृतिशील, कालसुसंगत चिकित्सा करणे ४. संत आणि समाजसुधारकांचा वारसा आणि संविधानाचा मूल्य आशय कृतिशील करणे ५. व्यापक परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेणे. या पंचसूत्रीवर अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्रभर तसेच भारताच्या विविध भागांत कार्यरत आहे. 'राष्ट्राचे भवितव्य शाळा-महाविद्यालयांमधून घडते', या जाणिवेतून समिती महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी यांच्या बरोबर विविध उपक्रमांमधून विवेकी समाजनिर्मितीसाठी कार्यरत आहे.

**वरील दोन्ही संस्था परस्पर सहयोगाने, सामूहिकपणे विविध उपक्रम राबविण्यासाठी दि. १२ जानेवारी २०२० रोजी सामंजस्य करार करीत आहेत.**

- **या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत –**

१. विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार-प्रसार करणे

२. आधुनिक, विज्ञाननिष्ठ, अंधश्रद्धामुक्त समाज निर्माण करणे



Scanned with OKEN Scanner

NIGHT COLLEGE OF ARTS & COMMERCE KOLHAPUR.

- माध्यमे

१. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, वैज्ञानिक जाणिवा निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, व्याख्याने, प्रदर्शने, पथनाट्ये, अभ्यास सहली, विविध स्पर्धा वगैरे उपक्रम राबविणे.

२. संविधान साक्षरता, लिंग समभाव, मानसिक आरोग्य निर्माण करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे, मानवी साखळी, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविणे.

३. व्यसनमुक्तीसंदर्भात प्रबोधन करणे. व्यसनांगुळे होणाऱ्या आजारांबाबत जागृती निर्माण करणे.व्यसनमुक्ती व दारुबंदी चळवळ राबविणे. गुटखा, तंबाखू मुक्तीसाठी विशेष प्रयत्न करणे.

४. पर्यावरणपूरक जीवनपद्धती निर्माण करण्यासाठी पर्यावरणपूरक सण-उत्सव, पर्यावरणपूरक गणपती, फटाक्यांविरोधात मोहीम, प्लास्टिक बंदी, इंधन वाचवा, प्रदूषण मुक्त वाहतुक इत्यादी उपक्रम राबविणे. सर्व प्रकारच्या प्रदूषणापासून मुक्ततेसाठी कृतिशील प्रयत्न करणे.

५. अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य, पर्यावरण, वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा अभ्यास, संशोधन व प्रसार करणे.

६. विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक समस्या, लैंगिक समस्या आदींचा अभ्यास करून त्यांच्यामध्ये आरोग्य साक्षरता निर्माण करणे.

७. दोन्ही संस्थांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे.

८. मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रबोधन करणे.

९. विवेकवाहिनीच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यासाठी बैठका, चर्चा, विचारविनिमय करून निर्णय घेणे. वर्षभराचे नियोजन करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे.

१०. शासन, सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था, शाळा, महाविद्यालये यांच्या सहयोगाने विविध उपक्रम राबविणे इत्यादी.

- आर्थिक व कायदेशीर बाबी

१. सदर सामंजस्य करार दोन्ही संस्थांचे पदाधिकारी परस्पर सहमतीने व कायदेशीररीत्या बांधील राहून करीत आहेत.

२. सामंजस्य करारातील उद्दिष्टांची अंमलबजावणी करण्यासाठी व वेगवेगळे उपक्रम राबविण्यासाठी दोन्ही संस्थांचे पदाधिकारी रीतसर बैठका घेऊन व त्यांच्या नोंदी ठेवून अंमजबजावणी करतील.



Scanned with OKEN Scanner

प्रत्येक कार्यक्रमाची माहिती परस्परांना दिली जाईल. त्या संदर्भातील कागदपत्रांचे आदानप्रदान केले जाईल.

३. सामंजस्य करारांतर्गत उपक्रमासाठीचा खर्च त्या त्या संस्थेने स्वतः करायचा आहे. संयुक्तपणे खर्च करावयाचा असल्यास त्या संदर्भात पदाधिकारी बैठकीत निर्णय घेतील. कार्यक्रमास उपस्थित दोन्ही संस्थांच्या कोणत्याही सदस्यास कोणत्याही प्रकारचा भत्ता देय असणार नाही.

४. कोणत्याही संस्थेला एकतर्फी करार संपुष्टात आणता येणार नाही.

५. करार संपुष्टात आणणे, कराराचे नूतनीकरण करणे यासाठी साठ दिवसांची पूर्वसूचना देऊन विशेष बैठकीचे आयोजन केले जाईल व त्या नंतर कायदेशीर बाबींची पूर्तता करून कराराबाबत निर्णय घेता येईल.

६. सामंजस्य कराराची उद्दिष्टे व अंमलबजावणीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे सर्व अधिकार या कराराची अंमलबजावणी करणाऱ्या दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात येत आहेत.

७. सदर सामंजस्य कराराचा कालावधी आज दि. १२ जानेवारी २०२० पासून दि. ११ जानेवारी २०२५ पर्यंत म्हणजे **पाच वर्षांचा** आहे.

८. सदर कराराची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालयाने प्राचार्य वा त्यांनी नियुक्त केलेले प्राध्यापक/समन्वयक तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष/प्रधान सचिव वा त्यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी संयुक्तपणे काम पाहतील.

९. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटींशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंगलात येत आहे.

समन्वयक

प्राचार्य

नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँन्ड कॉमर्स

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

कार्याध्यक्ष /प्रधान सचिव/प्रतिनिधी

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूर

दि. १२ जानेवारी २०२०



Scanned with OKEN Scanner

Council of Education's

**NIGHT COLLEGE OF ARTS AND COMMERCE**

Bindu Chowk, Kolhapur - 416002

(NAAC Re-Accredited-A)

Estd. 1971

E-mail : nightcollegekolhapur@gmail.com

I/c PRINCIPAL : Dr. S. J. Farakate (M.P.Ed., Ph. D.)

Phone(O) :(0231) 2640157

Mob. : 9822865509

दि. ०५/०९/२०२४

एनसी/

प्रति,

मा. अधिविभागप्रमुख

मास कम्युनिकेशन

शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर

विषय: स्त्री सन्मान परिषदेसाठी विद्यार्थी पाठवित असलेबाबत........

महोदय,

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती कोल्हापूर जिल्हा शाखेबरोबर नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अँण्ड कॉमर्स कोल्हापूर यांचा सामंजस्य करार झाला आहे. या करारा अंतर्गत आणि अंनिस कोल्हापूर व मास कम्युनिकेशन अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित स्त्री सन्मान परिषदेसाठी या महाविद्यालयातील खालील विद्यार्थी पाठवित आहोत.

१) रेश्मा खाडे, एम.ए. भाग दोन

२) पूर्वा घारगे, एम.ए. भाग दोन

३) प्रतीक्षा पंढारे, बी.ए. भाग दोन

४) निकिता जाधव, बी.ए. भाग दोन

५) शीला पाटील, एम.ए. भाग दोन

६) डॉ. अरुण शिंदे प्राध्यापक

कृपया वरील विद्यार्थ्यांना परिषदेमध्ये सहभागी करून घ्यावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

प्राचार्य

नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स,

कोल्हापूर.

Received

6.9.24

Scanned with OKEN Scanner

विज्ञान निर्भयता नीती शिवाजी विद्यापीठ

'स्त्री सन्मानासाठी पुरुषभान संवाद अभियान अंतर्गत'

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, कोल्हापूर आणि**
**मास कम्युनिकेशन अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# स्त्री सन्मान परिषद २०२४

## प्रमाणपत्र

साठी प्रतिक्षा विनय पंदारे
महाविद्यालय/संघटना नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स .

शुक्रवार दिनांक ६ सप्टेंबर २०२४ रोजी स्त्री सन्मान परिषदेमध्ये सहभागी होऊन आपण क्रियाशील योगदान दिल्याबद्दल आपणांस सन्मानपूर्वक हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

संवेदनशील आणि विवेकी माणूस म्हणून पुढील वाटचालीसाठी आपणांस मन: पूर्वक सदिच्छा!

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ. शिवाजी जाधव<br>समन्वयक, मास कम्युनिकेशन अधिविभाग<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | डॉ. बी. एम. हिर्डेकर<br>जिल्हा अध्यक्ष,<br>महाराष्ट्र अंनिस, कोल्हापूर | कृष्णात स्वाती<br>राज्य सरचिटणीस,<br>महाराष्ट्र अंनिस | रेश्मा खाडे<br>जिल्हा कार्याध्यक्ष<br>महाराष्ट्र अंनिस, कोल्हापूर |

## स्त्री सन्मान प्रतिज्ञा

मी अतिशय गांभीर्यतापूर्वक प्रतिज्ञा करत आहे की,

- एक संवेदनशील माणूस आणि जबाबदार नागरिक म्हणून मी भारतीय संविधानातील समता या मूल्याचा केवळ आदरच नव्हे तर काटेकोर आचरण देखील करीन.
- मी स्त्री स्वातंत्र्याचा सन्मान राखताना, माणूस म्हणून स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व, व्यक्तीमत्व, हक्क आणि अधिकार यांचा कोठेही संकोच होणार नाही याची काळजी घेईन.
- तसेच माणूस म्हणून स्त्रीला स्वतःच्या कुटुंबात व समाजात पुरुषांइतकेच मुक्त पर्यावरण मिळण्यासाठी आग्रही राहीन.
- यासाठी माझ्या पूर्व संस्कारातून आलेल्या धर्माधिष्ठित पुरुषसत्ताक विचारांचा निग्रहाने त्याग करीन.
- मी स्वत: कोणत्याही स्त्रीचा बोलण्या व वागण्यातून अवमान होणार नाही याची काळजी घेईन. कोणत्याही स्त्रीवर शारीरिक, मानसिक अत्याचार वा शोषण करणार नाही वा शोषणाचे समर्थन करणार नाही.
- स्त्रीयांवर होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अत्याचार, शोषण वा हिंसेचा मी पूर्ण ताकदीनिशी विरोध करेन.
- माझी हीच भूमिका पारलिंगी तसेच अन्य लिंगी व्यक्तींबाबत देखील असेल.
- मी माणूस म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा सन्मान व रक्षण करीन आणि माणूस म्हणून अधिक उन्नत होत राहीन.

Scanned with OKEN Scanner